आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

७ सप्टेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- सर्वत्र उत्साहात गणेशोत्सवाला प्रारंभ, ढोलताशांच्या गजरात गणरायाचं आगमन / राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांकडून भाविकांना शुभेच्छा

- विधानसभा निवडणुकीनंतर जम्मू काश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा दिला जाईल, असं केन्द्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं आश्वासन

- ओदिशा, आंध्र प्रदेशाचा किनारी भाग आणि तेलंगणामध्ये पुढचे चार दिवस मुसळधार पाउस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज

- पॅरालिम्पिक मध्ये होकातो होतोझे सेमा यानं कांस्यपदक पटकावल्याबद्दल राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांकडून अभिनंदन, तर नागालँड सरकारकडून दीड कोटीं रुपयांचं बक्षीस जाहीर

**आणि**

- २० वर्षांखालच्या जागतिक कुस्ती स्पर्धेच्या क्रमवारीत भारताच्या महिला कुस्तीपटूंनी फ्रीस्टाइल प्रकारात पटकावलं दुसरं स्थान

○ **<><><><><>**

आज भाद्रपद शुक्ल चतुर्थी. ११ दिवसांच्या गणेशोत्सवाला आज सर्वत्र मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. महाराष्ट्रात ढोलताशांच्या गजरात गणरायाचं घरोघरी आणि सार्वजनिक मंडपांमध्ये आगमन झालं. महाराष्ट्राचं वैशिष्ट्य असलेला हा उत्सव अनुभवण्यासाठी अनेक परदेशी पर्यटक मुंबई - पुण्यात आले आहेत. या उत्सव काळात राज्यात सुमारे ११ हजार कोटी रुपयांहून अधिक व्यापार होण्याची

शक्यता व्यापारी संघटनांनी व्यक्त केली आहे. पूजा साहित्य, वस्त्रालंकार, तसंच मिठाईच्या दुकानांमध्ये मोठी उलाढाल पाहायला मिळते.

गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात आज मुंबईत सव्वा दोन लाख घरगुती आणि सुमारे १२ हजार सार्वजनिक मूर्तींची मोठ्या भक्तीभावानं प्रतिष्ठापना झाली. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते राजभवनात गणरायाची प्रतिष्ठापना झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा बंगल्यावर बाप्पाच्या मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना झाली. श्री गणरायाचं आगमन आनंदाचं, समृद्धीचं पर्व घेऊन येवो, अशी सदिच्छा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे. गणेशाची मनोभावे सेवा करतानाच सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे. तसंच पर्यावरणाची योग्य काळजी घेऊन सणवार साजरे केले जावेत, असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

**मुंबईत** लालबागच्या राजासह मोठ्या सार्वजनिक गणपतींच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच रांगा लागल्या आहेत. मुंबई महापालिकेनं गणेशोत्सवासाठी चोख व्यवस्था केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी मुंबई पोलीस दलानं ३२ पोलीस उपायुक्त, ४५ सहायक पोलीस आयुक्त, २ हजार ४३५ पोलीस अधिकारी, १२ हजार ४२० पोलीस अंमलदार तसंच राखीव पोलीस दलाच्या तुकड्या, जलद प्रतिसाद पथकं, दंगल नियंत्रण पथकं असा चोख बंदोबस्त तैनात केला आहे.

**कोकणात** दाखल झालेल्या चाकरमान्यांनी लेझीम आणि ढोलपथकासह बाप्पाच्या मूर्ती घरी आणल्या. रत्नागिरी जिल्ह्यात यंदा एक लाख ६६ हजार ८६७ घरगुती, आणि १२२ सार्वजनिक गणेशमूर्ती विराजमान झाल्या.

**पुण्यात** कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी गणपती, गुरुजी तालीम गणपती, तुळशीबाग गणपती आणि केसरीवाडा गणपती या पाच मानाच्या गणपतींचं ढोलताशाच्या गजरात आगमन झालं. गणेशोत्सवाच्या काळात गणेश मंडळांचे देखावे बघण्यासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी गणेशोत्सव काळात मेट्रोच्या वेळांमध्ये बदल करून मेट्रोची प्रवासी सेवा मध्यरात्रीपर्यंत चालवल्या जाणार आहेत, तसंच मेट्रो फेऱ्याही वाढवल्या जाणार आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, लोकमान्य टिळकांनी पुण्यातून सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव आता आंतरराष्ट्रीय झाला आहे. विविध देशात कशा रितीनं गणेशोत्सव साजरा केला जातो हे तिथे राहत असलेल्या नागरिकांकडून आपण जाणून घेणार आहोत. महाराष्ट्र सत्संग परिवार, मराठी हिंदू सेवा संघ कराचीमधल्या रत्नेश महादेव मंदिरात गणपती बसवतात. याविषयी कराचीमध्ये राहणारे विशाल राजपूत यांनी आकाशवाणीला सांगितलं…

**होल्ड बाइट विशाल राजपूत, पाकिस्तान**

**<><><><><>**

गणेशचतुर्थीनिमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्री यांनी देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण देशातल्या अनेक भागात एकत्रित येऊन साजरा केला जातो आणि हे सामाजिक ऊर्जेचे एक चांगले उदाहरण आहे. असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे की, गणेशोत्सवाचा हा सण बुद्धी, समृद्धी आणि उज्वल भविष्य देणारा आहे. आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गणपती बाप्पा मोरया म्हणत देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीनंतर जम्मू काश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा दिला जाईल, असं आश्वासन भाजपाचे ज्येष्ठ नेते, केन्द्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज दिलं. ते जम्मूमध्ये जाहीर प्रचार सभेत बोलत होते. आगामी विधानसभा निवडणूक ऐतिहासिक असल्याचं ते म्हणाले. कलम ३७० हटवल्यानंतर जम्मू काश्मीरमध्ये पहिल्यांदाच निवडणूक होत आहे. काँग्रेस - नॅशनल कॉन्फरेन्स आघाडी जुनी व्यवस्था पुन्हा आणण्याचा प्रयत्न करत असल्याचा, तसंच जम्मू कश्मीरला पुन्हा दहशतवादाच्या खाईत लोटण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

<><><><><>

हवामान विभागानं ओदिशा, आंध्र प्रदेशाचा किनारी भाग आणि तेलंगणा मध्ये पुढचे चार दिवस मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. आगामी तीन दिवसांत तेलंगण, ओदिशा आणि मध्य महाराष्ट्रात अत्यधिक ते मुसळधार पावसाचा अंदाज आहे. ईशान्य भारतात आगामी सात दिवस मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. केरल, माहे, दक्षिण कर्नाटक तसंच कर्नाटकचा किनारपट्टीकडचा भाग इथे येत्या सोमवारपर्यंत तर मध्य प्रदेशात आगामी सात दिवसांपर्यंत हीच स्थिती राहू शकेल. या आठवड्यात दिल्लीच्या आसपास तसंच पश्चिम आणि मध्य भारतामध्ये काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस व्हायची शक्यता आहे.

<><><><><>

पॅरालिम्पिक मध्ये पुरुषांच्या गोळाफेकीत होकातो होतोझे सेमा याने कांस्य पदक जिंकल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्याचं

अभिनंदन केलं आहे. राष्ट्रपतींनी सेमा याच्या कामगिरीचं समाजमाध्यमाद्वारे कौतुक केलं. एका भुसुरुंग स्फोटातून बचावलेल्या सेमा यानं आपल्या पॅरालिम्पिक स्पर्धेतल्या पदार्पणातच पदक जिंकल्याचा राष्ट्रपतींनी आवर्जून उल्लेख केला. तसंच त्याच्या उज्ज्वल भविष्याबद्दल शुभेच्छा दिल्या. तर हा देशासाठी अभिमानास्पद क्षण असल्याचे गौरवोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काढले.

नागालँड सरकारनं सेमा यानं कांस्य पदक जिंकल्याबद्दल दीड कोटींचं बक्षीस जाहीर केलं आहे. सेमा यानं पदक जिंकल्याचा राज्याला अभिमान आहे, असं नागालँडचे मुख्यमंत्री निफ्यु रियो यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. सेमा याला अर्जुन पुरस्कारानं सन्मानित करण्यात यावं याची शिफारस केंद्र सरकारकडे करणार असून त्याने केलेल्या राष्ट्रसेवेबद्दल त्याची बढती करण्याची मागणीही संरक्षण मंत्रालयाकडे केली जाणार असल्याचं रियो यांनी सांगितलं.

दरम्यान, पॅरीस पॅरालिम्पिकमध्ये भारतानं आतापर्यंत २७ पदकं जिंकली आहेत. यात ६ सुवर्ण, ९ रौप्य आणि १२ कांस्य पदकांचा समावेश आहे. भारताच्या पॅरालिम्पिकच्या इतिहासातली ही सर्वोत्तम कामगिरी आहे.

**<><><><><>**

स्पेनच्या पोंटेवेद्रा इथं झालेल्या २० वर्षांखालच्या जागतिक कुस्ती स्पर्धेच्या क्रमवारीत भारताच्या महिला कुस्तीपटूंनी फ्रीस्टाइल प्रकारात दुसरं स्थान पटकावलं. त्यांनी १ सुवर्ण, १ रौप्य आणि ३ कास्य अशी एकंदर ५ पदकं जिंकली. ६२ किलो वजनी गटात नितिका हिला काल रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं, तर ५७ किलो वजनी गटात नेहा हिनं हंगरीच्या प्रतिस्पर्ध्यावर मात करून कास्यपदकावर नाव कोरलं. तत्पूर्वी, ७६ किलो वजनी गटात ज्योती बेरवाल हिनं सुवर्णपदकाला गवसणी घातली होती, तर कोमल हिनं ५९ किलो वजनी गटात, तर

सृष्टी हिनं ६८ किलो वजनी गटात कास्यपदक पटकावलं होतं. पुरुषांची फ्रीस्टाइल स्पर्धा आजपासून सुरू होणार आहे. भारताचे दोन कुस्तीपटू कांस्यपदकासाठी मैदानात उतरणार आहेत.

**<><><><><>**

देशातले खेळाडू आणि त्यांचे प्रशिक्षक यांना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात केंद्र सरकार कटीबद्ध असल्याचं केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत पॅरीस पॅरालिम्पिक स्पर्धेतील खेळाडूंचा सन्मान केल्यानंतर बोलत होते.

**<><><><><>**

अबु धाबीचे युवराज शेख खलीद बिन मोहम्मद बिन झायद अल नाहायन उद्यापासून तीन दिवसांच्या भारत भेटीवर येत आहेत. त्यांच्याबरोबर अबुधाबीच्या विविध मंत्रालयाचे मंत्री आणि उद्योजकही दौऱ्यावर येत आहेत.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर उद्यापासून दोन दिवसांच्या रियाध आणि सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर जात आहेत. यावेळी ते पहिल्या भारत आखात सहकार्य मंडळाच्या सदस्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. या दौऱ्यात ते सहभागी देशाच्या परराष्ट्र मंत्र्याशी द्विपक्षीय चर्चाही करतील.

**<><><><><>**

हरयाणा विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं पहिली उमेदवारी जाहीर करताच पक्षात बंडखोरीला सुरुवात झाली आहे.

**//<><><><><>//**